MHPU180021622016

## निशाणी क्र.९७ वरील आदेश
(दिनांक ०२.०४.२०२४)

सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्याचे कामकाज चालु असतांना या दाव्यातील प्रतिवादी क्र.२ कांताबाई यशवंत भागवत या दि.०४.०४.२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. वादीस प्रतिवादी क्र.२ यांच्या वारसांविरुध्द सदरचा दावा चालविण्याचा हक्क व अधिकार आहे. मयत प्रतिवादी क्र.२ यांना सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ श्री. यशवंत मारुती भागवत, प्रतिवादी क्र.३ श्री. संजय यशवंत भागवत या वारसांसह त्यांचा मयत मुलगा अंकुश यांची मुलगी मिनाक्षी अंकुश भागवत, संतोष अंकुश भागवत, तसेच मुलगी रंजना ज्ञानदेव खराडे असे वारस आहेत. दरम्यान सदरील प्रतिवादी क्र.१ व ३ हे वारस दाव्यात समाविष्ट आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा रेकॉर्डवर घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.२ यांचे वर प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्याशिवाय असलेले वर नमुद केलेले अन्य वारस सरनाम्यातील प्रतिवादी क्र.२ यांच्या नावाला कंस करुन त्याखाली प्रतिवादी क्र.२अ, २ब व २क म्हणुन पुढीलप्रमाणे समाविष्ट करुन ते रेकॉर्डवर घेण्यात यावेत.

**२अ मिनाक्षी अंकुश भागवत,**
वय – २३ वर्षे, धंदा – शेती.

**२ब संतोष अंकुश भागवत,**
वय – २२ वर्षे, धंदा – शेती,
क्र.२अ व २ब रा. पाटस, ता. दौंड, जि. पुणे.

**२क रंजना ज्ञानदेव खराडे,**
वय – ४५ वर्षे, धंदा – शेती,
रा. निमगांव केतकी, ता. इंदापुर, जि. पुणे.

वरीलप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

३. सदर अर्जास संधी देऊनही प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांचा जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३ च्या जबाबाविना पुढे चालविण्यात आला.

४. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एस. गवळी यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व जबाब वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादींनी नि.५६ यादीलगत प्रतिवादी क्र.२ कांताबाई यशवंत भागवत यांचे मृत्युप्रमाणपत्र नि.९९ अन्वये दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि.०४.०४.२०१८ रोजी कांताबाई यशवंत भागवत यांचे निधन झालेले आहे. तसेच दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ हे दि.२५.०६.२०२१ रोजी मयत झाले व त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकामी झालेला उशीर माफ करुन मिळण्यासाठीचा अर्ज नि.६७ अन्वये दाखल आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठीचा अर्ज नि.१०० अन्वये दाखल आहे. नि.१०० चे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादी क्र.२अ ते २क हेच प्रतिवादी क्र.१अ ते १क वारस म्हणुन नमुद केलेले दिसुन येतात. तसेच दावा नि.१ चे अवलोकन केले असता त्यामध्ये सदर अर्जातील २अ मिनाक्षी भागवत या प्रतिवादी क्र.७ तसेच सदर अर्जातील २ब संतोष अंकुश भागवत हे प्रतिवादी क्र.८ म्हणुन सामील आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस म्हणुन २अ व २ब हे अगोदरच अभिलेखावर असल्यामुळे त्यांना अभिलेखावर आणण्याची आवश्यकता नाही. याव्यतिरिक्त प्रतिवादी क्र.३ यांनी नि.७९ अन्वये प्रतिवादी क्र.७ मिनाक्षी अंकुश भागवत या दि.२४.११.२०२२ रोजी मयत झाल्याबाबत कळविले आहे. त्यानंतर वादींनी नि.८२ अन्वये प्रतिवादी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घेण्याकामी झालेला उशीर माफीचा अर्ज, नि.८० अन्वये अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज व नि.८४ अन्वये प्रतिवादी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठीचा अर्ज असे अर्ज दाखल केलेले आहेत. त्यामुळे सदर अर्जात नमुद वारस २अ व २ब यांना दाव्यात या अगोदरच समाविष्ट केले असल्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र.२ चे वारस म्हणुन पुन्हा रेकॉर्डवर घेता येणार नाही. अर्जातील कारणांचा विचार करता वादींची विनंती अंशतः मान्य केल्यास कोणत्याही प्रकारची बाधा राहणार नाही. तसेच मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट अर्ज मंजुर केल्यास मुळ दावा गुणदोषावर निकाली काढता येईल. करिता नि.५१ व ९५ च्या अर्जांवरील आदेशाच्या अनुषंगाने मी खालील आदेश करीत आहेः–

## आदेश

१. वादींचा अर्ज नि.क्र.९७ अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी दाव्यात प्रतिवादी क्र.२ च्या नावाला कंस करुन मयत

वारस असे लिहुन अर्जातील नमुद रंजना ज्ञानदेव खराडे यांचे वारस प्रतिवादी क्र.२अ म्हणुन त्यांचे नाव, वय, धंदा व पत्ता नमुद करुन प्रतिवादी क्र.२ चे वारस म्हणुन समाविष्ट करावे. त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करावी तसेच दुरुस्त दाव्याच्या प्रती अभिलेखावर दाखल कराव्यात व त्याच्या प्रती इतर प्रतिवादींना द्याव्यात. त्यानंतर प्रतिवादी क्र.२अ यांना समन्स काढण्यात येईल.

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2024.04.02 18:17:39 +0530

दौंड. [ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
दि. ०२.०४.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>Jt. C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Date | :- | 02.04.2024. |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 02.04.2024. |
| Order uploaded on | :- | 02.04.2024. |